**पुढील सरतपासणी शपथेवर द्वारा श्री के. जी. रामटेके, तक्रारदाराचे वकिल.**

०९. मी शपथेवर कथन करतो की, प्रतिज्ञापत्रातील मजकूर मी वाचला असुन त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी स्वाक्षरी असुन त्यातील मजकूर सत्य आहे.

१०. नि.क्रं. यु-३ प्रमाणे मी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अ.क्रं. १ वर दि. २४/०२/२०२३ रोजी अध्यक्ष, महा. राज्य महिला आयोगाला पाठविलेल्या तक्रारीची प्रत आहे. त्यास **नि.क्रं. यु-१०** देण्यात येते. अ.क्रं. २ पोस्टाची पावती दाखल केली असुन त्यास **नि.क्रं. यु-११** देण्यात येते. अ.क्रं. ३ वर दि. २४/०२/२०२३ रोजी अध्यक्ष, केंद्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाला पाठविलेल्या तक्रारीची प्रत आहे. त्यास **नि.क्रं. यु-१२** देण्यात येते. अ.क्रं. ५ वर अंतर्गत बदली आदेश दि. १२/०४/२०२३ ची प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१३** देण्यात येते. अ.क्रं. ६ वर पोलीस स्टेशन, साकोली येथे केलेल्या तक्रारीची प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१४** देण्यात येते. अ.क्रं. ७ वर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि. १९/०४/२०२३ रोजी दिलेल्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१५** देण्यात येते. अ.क्रं. ८ वर पोस्टाची पावती दाखल केली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१६** देण्यात येते. अ.क्रं. ९ वर माझे वकिलांनी पाठविलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१७** देण्यात येते. अ.क्रं. १० पोस्टाची पावती दाखल केली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१८** देण्यात येते. अ.क्रं. ११ वर पोलिस अधिक्षक यांचेकडे दि. १४/०५/२०२३ रोजी केलेल्या तक्रारीची प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्रं. यु-१९** देण्यात येते. अ.क्रं. १३ वर

......६/-

शाखा व्यवस्थापक यांना केलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि. कं. यु-२०** देण्यात येते.

**उलटतपासणी द्वारा श्री एस. के. कोतवाल, गैरअर्जरदाराचे वकिल.**

११. मी माझे पती पासून वेगळे राहते. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुले लहान असल्यामुळे माझी अशी ईच्छा होती की सानगडी येथेच राहून काम करायचे. हे म्हणणे खरे आहे की, सानगडी या शाखेत श्री मानवटकर हे शाखा व्यवस्थापक होते. तसेच श्री कापगते हे लिपीक होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२/०४/२०२३ रोजी श्री मानवटकर यांची बदली एकोडी शाखेत झाली व श्री कापगते यांची बदली पळसगांव येथे झाली. हे म्हणणे खरे नाही की, बदली होईपर्यंत मी बॅकेच्या मुख्य शाखेत श्री मानवटकर यांचेकडून त्रास असल्याबाबत लेखी तक्रार केली नाही म्हणुन मी कुठलीही तक्रारीची स्थळप्रत दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री मानवटकर यांचे सोबत माझे नेहमी वाद होत होता. हे म्हणणे खरे नाही की, बॅकेचे काम सुरळीत चालावे म्हणुन माझी बदली मासळ शाखेत, श्री मानवटकर यांची बदली एकोडी शाखेत आणि श्री कापगते यांची बदली पळसगांव शाखेत करण्यात आलेली होती.

१२. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली होती. माझे तक्रारीवरुन गुन्हा नोंद झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे दिलेल्या तक्रारीत तथ्य आढळून न आल्याने गुन्हयांची नोंद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वैयक्तिक कारणामुळे मला

सानगडी येथे राहूनच काम करायचे होते म्हणुन मी सदरची खोटी तक्रार दाखल केली.

१३. हे म्हणणे खरे आहे की, मी शिपाई पदावर कार्यरत असुन बॅक हे शिपाई यांना एका शाखेतून दुस-या शाखेत बदली करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपासणी संपली.

फेरतपासणी - निरंक.

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

भंडारा.
दिनांक :- ०६/०३/२०२६.

(किशोर म. जयस्वाल)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, भंडारा.